महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
Website - www.msbsd.edu.in Email - secretary@msbsde.edu.in दुरध्वनी क्र. ०२२-२६४७४४३५

तात्काळ / अतिमहत्वाचे

पत्र क्र. का.क्र.०१/मान्यता/२०२२/ ८४७
दिनांक: २५.०५.२०२२.

प्रति,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय (सर्व)

विषय: अनामत रक्कम मंडळाच्या बँक खाती जमा करणेबाबत.

संदर्भ: महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, दि. २०.०१.२०२२, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ - महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम, २०२१

१. संदर्भीय अधिनियम अन्वये राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा यानुसार कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि उद्योजकता शिक्षण व महाराष्ट्र राज्यातील इतर कौशल्य पाठ्यक्रम यांच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींचे नियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक इतर बाबींसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ स्थापन करण्यासाठी व विधीसंस्थापित करण्यासाठी अधिनियम, २०२१ निर्गमित करण्यात आला आहे.

२. उपरोक्त अधिनियमातील प्रकरण तीन मध्ये नियामक परिषदेचे व मंडळाचे अधिकार व कर्तव्ये देण्यात आले आहेत. अधिनियमातील कलम २५ अन्वये मंडळाचे अधिकार व कर्तव्ये देण्यात आले आहेत. पोटकलम (५) नुसार सुरक्षा ठेव, संलग्नता, नाव नोंदणी, सल्ला, स्वायत्तता प्रदान करणे, सममूल्यता देणे यांसह मूल्यनिर्धारण, परीक्षा आणि इतर सेवा यांसाठी आणि मंडळाने पुरविलेल्या सल्लाविषयक सेवांसाठी, मंडळास योग्य वाटेल असे शुल्क व शास्ती आणि इतर आकार निर्धारित करणे, विनिर्दिष्ट करणे आणि विद्यार्थी व इतर कोणतीही व्यक्ती, संस्था, उद्योग किंवा निगम निकाय यांच्याकडून त्याचे प्रदान स्वीकारणे यास मान्यता देण्यात आली आहे

सन २०२१-२२ पर्यंत मान्यता देण्यात आलेल्या सर्व संस्थांपैकी (जुन्या व नवीन संस्था) तसेच कायम स्वरूपी मान्यताप्राप्त संस्थांपैकी ज्या संस्थांनी अनामत रक्कम बँक गॅरंटी स्वरूपात मंडळाकडे जमा केली आहे, अशा सर्व संस्थांनी सदर बँक गॅरंटीची रक्कम मंडळाच्या बँक खात्यात दिनांक ३१.०८.२०२२ पर्यंत जमा करावी. मंडळाच्या खात्यात अनामत रक्कम जमा केल्यानंतर संस्थांनी यापूर्वी मंडळाकडे जमा केलेली बँक गॅरंटी परत करण्यात येईल.

३. मंडळाच्या बँक खात्यात दिनांक ३१.०८.२०२२ पर्यंत संस्थेकडून बँक गॅरंटीची रक्कम जमा न झाल्यास अश्या संस्थांचा सन २०२२-२३ पासुन संलग्नता नूतनीकरण करिता विचार केला जाणार नाही.

४. तसेच सदर परिपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांकानंतर नव्याने मान्यता प्राप्त संस्थांनी अनामत रक्कम मंडळाच्या खालील बँक खात्यातच जमा करावी. बँक गॅरंटी स्वरुपात अनामत रक्कम स्विकारण्यात येणार नाही.

५. उपरोक्त प्रमाणे सुचना मंडळाच्या मान्यताप्राप्त संस्थांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.

| | |
|---|---|
| ACCOUNT HOLDER NAME : | MSBSVET |
| BANK : | HDFC BANK |
| BRANCH: | KALHER BHIWANDI |
| ACCOUNT NUMBER: | 501 00 506 165 732 |
| IFSC: | HDFC0006198 |

मा.संचालकांच्या मान्यतेने

(के.डी. शिंदे)
सचिव

प्रत: माहितीसाठी

१. मा.प्रधान सचिव,कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२. मा.संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई-१

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

१. मा.सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२. सर्व मान्यताप्राप्त संस्था व इच्छुक संस्था
३. संगणक विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता)
४. लेखाविभाग
५. निवडनस्ती